क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

**प्रशासकीय परिपत्रक क्र. ४३३ दिनांक ०३ / १० / २०१२**

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ करिताच्या बोधचिन्हा (LOGO) बाबत.

संदर्भ : महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र.केमाअ-२०११/४०८/प्र.क्र.२२९/११/सहा, दि.२२/११/२०११.

.....

कार्यासन अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.आयएलई-२०११/ प्र.क्र.४६७/प्रशा-३ दि.२६.१२.२०११ सोबत प्राप्त झालेल्या महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र.केमाअ-२०११/४०८/ प्र.क्र.२२९/११/सहा, दि.२२/११/२०११ च्या अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ करीता तयार केलेल्या बोधचिन्ह (LOGO) चा वापर करण्याबाबतच्या सूचना प्रशासकीय परिपत्रक क्र. ४००, दि. ०२/०३/२०१२ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

२. तसेच, दिनांक २२/११/२०११ च्या सदर शासकीय परिपत्रकान्वये माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ करिता तयार केलेले 'बोधचिन्ह' (LOGO) सर्व शासकीय कार्यालयात/सार्वजनिक प्राधिकरणात जेथे कार्यालयीन टपाल स्विकारले जाते तेथे ठळकपणे दृष्टीपथास पडेल अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे ते शासनाच्या सर्व प्रकारच्या लेखन सामुग्रीवर प्रादेशिक मराठी भाषेत छापून घेणेबाबत सूचित करण्यात आले आहे.

३. यास्तव, प्रशासकीय कार्यालयातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार कायदा-२००५ करिता करण्यात येणाऱ्या पत्र व्यवहाराच्या लेखन सामग्रीवर सदर बोधचिन्ह (LOGO) छापुन घ्यावे व त्याच्या वापराबाबत पारीत करण्यात आलेल्या शासन आदेशाचे अवलोकन करुन त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याची कृपया दक्षता घ्यावी. महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र.केमाअ-२०११/४०८/प्र.क्र.२२९/११/सहा, दि.२२/११/२०११ ची प्रत सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

*( संदेश ए. हाके )*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिताच्या बोधचिन्हा (LOGO) बाबत**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन परिपत्रक क्रमांक - केमाअ २०११ /४०८/प्र.क्र.२९/११/सहा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २२/११/२०११.

**परिपत्रक :-**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ करिता केंद्र शासनाने " बोधचिन्ह " (LOGO) तयार केलेले आहे ( सोबत झेरॉक्स प्रत जोडली आहे ) हे बोधचिन्ह सर्व शासकीय कार्यालयात/ सार्वजनिक प्राधिकरणात जेथे कार्यालयीन टपाल स्वीकारले जाते तेथे ठळकपणे दृष्टीपथास पडेल अशा ठिकाणी प्रदर्शित करावयाचे आहे तसेच ते शासनाच्या सर्व प्रकारच्या लेखन सामुग्रीवर प्रादेशिक मराठी भाषेत छापून घेणे आवश्यक आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या बोधचिन्हाचा (LOGO) वापर कसा करावा याबाबतच्या मार्गदर्शक सूचना केंद्रशासनाच्या www. rtigateway.org.in हया संकेतस्थळावर तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या gad.maharashtra.gov.in हया संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, मंत्रालयीन विभागामध्ये तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांच्या ठिकाणी हे बोधचिन्ह प्रदर्शित करण्याबाबत तसेच सर्व शासकीय सामुग्रीवरही छापून घेण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. याची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल या विभागास तात्काळ सादर करण्यात यावा.

४. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या wwwmaharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१११२२१११४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( नंदकुमार जंत्रे )
सचिव ( प्र.सु.व र.व का. )

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

# सूचना का अधिकार

# माहितीचा
# अधिकार